R Zonewala

महाराष्ट्र शासन

7-2-90
1181

क्रमांक: एसटीसी-३५९०/[२२४५]विशि-२
शिक्षण व सेवायोजन विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२
दिनांक: २५ जाने. १९९०.

प्रति,

कुलसचिव,
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

विषय: सन १९९०-९१ या शैक्षणिक वर्षापासून अध्यापक महाविद्यालये उघडण्यास परवानगी.

महोदय,

सन १९९०-९१ या वर्षापासून नवीन महाविद्यालये उघडण्याकरिता शासनास प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार करून अंजुमन-ए-इस्लाम, मुंबई या संस्थेच्या १९९०-९१ पासून खाली नमूद केल्याप्रमाणे नवीन अध्यापक महाविद्यालये उघडण्याकरिता आलेल्या अर्जावर मुंबई विद्यापीठ अधिनियम १९७४ च्या कलम ४३[४] व [५] अन्वये पुढील कार्यवाही करण्याची विद्यापीठास परवानगी देण्याचे शासनाने ठरविले आहे.

| महाविद्यालयाचे ठिकाण | विद्याशाखा |
| --- | --- |
| नवी मुंबई | अध्यापक महाविद्यालय [उर्दू माध्यमाचे] |

२. शासनाने संलग्नीकरणाकरिता वर दिलेली परवानगी ही पुढील अटींवरच आहे. :-

१. सदर महाविद्यालयास कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी देण्यात येत आहे.

२. संस्थेने विद्यापीठाकडे ३० नोव्हें. १९८९ पूर्वी नवीन अध्यापक महाविद्यालय सुरू करण्याकरिता अर्ज केलेला असावा. तसा अर्ज न केल्यास विद्यापीठाकडे इतर कोणत्याही संस्थाकडून सदर ठिकाणासाठी अध्यापक महाविद्यालय सुरू करण्यासाठी विद्यापीठास अर्ज प्राप्त झालेला नसावा.

....२/..

Scanned by CamScanner

३. सदर महाविद्यालयाची प्रवेशक्षमता ८० असेल व दरवर्षी प्रत्येक विद्यार्थ्यास सदर महाविद्यालये रु. २५००/- शिक्षणशुल्क आकारतील. विद्यापीठाने घालून दिलेल्या इतर अटी व शर्ती सदर अध्यापक महाविद्यालयाकडून पालन करण्यात याव्ये.

४. स्थानिक चौकशी समिती, कार्यकारी परिषद व सिनेट यांचा अहवाल विद्यापीठाकडून प्राप्त झाल्यावर कलम ४३[६] व [७] यानुसार अंतिम संलग्नीकरणाचे आदेश शासनाकडून निर्गमित करण्याबाबत योग्य ती कार्यवाही केली जाईल.

याची प्रत संबंधित व्यवस्थापनाकडे पाठविण्यात येत आहे.

आपला विश्वासू,

[ द. रा. माळी ]
सहाय्यक सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१) शिक्षण संचालक [उच्च शिक्षण] महाराष्ट्र राज्य, पुणे
२) प्रशासनाधिकारी [उच्च शिक्षण अनुदान]
मुंबई विभाग मुंबई
३) सचिव, अंजुमन-ए- इस्लाम, मुंबई
४) निवड नस्ती.